वर्ष- ११ | अंक- २८ | मुंबई, मंगळवार, २७ मे ते २ जून २०२५ | पृष्ठ-४ | मूल्य २/- रुपये
ठाणे आवृत्ती
मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
POSTAL REGISTRATION No. PLG/205/2025- 2027

# पोलीस बातमी पत्र
## POLICE BATMI PATRA

• संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 एक्सपायरी डेटनंतर दूध प्यायल्यास काय होईल?
3 → न्यायप्रविष्ट आणि अभिव्यक्तीचा नवा अन्वयार्थ
अखेर काशीगाव मेट्रोस्थानकाच्या जिन्याचे काम सुरू ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

# मुंबई पोलिस शिपाईचा होणार आता जवानांप्रमाणे सन्मान!





## मुंबई पोलीस आयुक्तांचा आदेश जारी

**मुंबई:** मुंबई पोलीस दलातील प्रत्येक शिपाईचा यापुढे सैन्यातील जवानाप्रमाणे विशेष सन्मान करण्याचा आदेश, मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती यांनी सर्व वरिष्ठ अधिकार्यांना दिला आहे. सैन्यामध्ये ज्याप्रकारे पदोन्नती मिळाल्यानंतर प्रत्येक जवानांचा सन्मान केला जातो. हीच प्रथा आता मुंबई पोलीस दलात सुरू केली जाणार आहे.

मुंबईचे पोलीस आयुक्त देवेन भारती यांनी, मुंबई पोलीस दलातील पदोन्नती मिळालेले अधिकारी आणि अंमलदारांचा बँड पथकाच्या संचलनाद्वारे सन्मान करा, असा आदेश सर्व वरिष्ठ अधिकार्यांना पत्राद्वारे दिला आहे. पोलिसांच्या पदोन्नतीचे आदेश जारी होताच त्यानंतर येणाऱ्या 1 तारखेला त्यांचा सन्मान केला जावा, असे निर्देश भारती यांनी दिले. मुंबई पोलिस आयुक्तांच्या आदेशानुसार अतिरिक्त पोलिस आयुक्त हे पदोन्नतीप्राप्त अंमलदारांचा तर पोलिस सहआयुक्त हे उपनिरीक्षक ते सहायक आयुक्तपर्यंत दर्जाच्या अधिकाऱ्यांचा सन्मान करतील. यात अंमलदार असो वा अधिकारी पदोन्नती मिळाल्यावर त्यांचे मनोबल वाढावे, केवळ प्रशासकीय बाब नाही तर काम करण्यास प्रोत्साहन मिळावे, यासाठी हा निर्णय महत्वाचा असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे.

**पदोन्नती हा निव्वळ प्रशासकीय सोपस्कार न राहता प्रेरणास्त्रोत व्हावा हा उद्देश**

पदोन्नती ही केवळ पदवाढ नसून त्यामागे संबंधित अधिकारी, अंमलदारांची अनेक वर्षांची निष्ठा, मेहनत दडलेली असते. पदोन्नती म्हणजे कर्तव्यादरम्यान पार पाडलेली जबाबदारी, कर्तृत्व व समर्पणाला मिळालेली मान्यता असते, असे ही त्यात नमूद केले आहे. त्यामुळे पदोन्नती हा निव्वळ प्रशासकीय सोपस्कार न राहता प्रेरणास्त्रोत व्हावा, हा उद्देश असल्याचेही देवेन भारती यांनी पत्रात म्हटले आहे.

**निवृत्त पोलीस अधिकारी शारदा प्रसाद यादव यांचे निधन**

दरम्यान काल शनिवारी रात्री निवृत्त पोलीस अधिकारी शारदा प्रसाद यादव यांचे 67 व्या वर्षी मुंबईत निधन झाले आहे. ते गेल्या काही दिवसांपासून त्यांची प्रकृती ठीक नसल्यामुळे त्यांच्यावर माहीम येथील हिंदूजा रुग्णालयात उपचार सुरू होते. गोरेगाव पूर्व येथील आरे परिसरातील शिवधाम स्मशानभूमीत सायंकाळी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुलगा व मुलगी असा परिवार आहे. त्यांचा मुलगा खासगी विमान कंपनीत वैमानिक पदावर कार्यरत असल्याची माहिती अधिकाऱ्याने दिली.

**नागपूर पोलीस आयुक्त पदाची कारकिर्द राहिली चर्चेत**

यादव भारतीय पोलीस सेवेच्या 1986च्या तुकडीचे अधिकारी होते. यादव यांची नागपूर पोलीस आयुक्त पदाची कारकिर्द चर्चेत राहिली. यावेळी त्यांनी पोलीस व नागरिकांमधील संबंध मैत्रीपूर्ण करण्याकडे भर दिला होता. त्याचा परिणाम गुन्हे रोखण्यासाठीही झाला होता. गुंड आणि गुन्हेगारांविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा(मोक्का) अंतर्गत गुन्हे दाखल करून त्यांनी नागपूरमधील गुन्हेगारी मोडीत काढली. त्या काळात त्यांनी सर्व पोलीस ठाण्यांना व्हाट्सअॅप ग्रुप, फेसबुक आणि ट्विटरवर अकाउंट सुरू करण्यास प्रोत्साहित केले. प्रत्येक पोलीस ठाण्याच्या व्हाट्सअॅप ग्रुपमुळे जनतेशी चांगले संबंध राखण्यास मदत झाली. राज्याच्या अतिरिक्त पोलीस आयुक्त(कायदा व सुव्यवस्था) पदावरही कार्यरत होते. तसेच गुन्हे अन्वेषण विभागाच्या अतिरिक्त महासंचालक पदीही ते कार्यरत होते.

## धोका वाढतोय! मुंबईत कोरोनाचा फैलाव?


### दोन संशयित कोरोनाबाधितांच्या मृत्यूनं वाढवली चिंता

**आशियाई देशांमध्ये कोरोनाची दहशत..**

आशियाई देशांमध्ये एकाएकी कोरोनाची दहशत वाढली असून, हाँगकाँग, सिंगापूरमध्ये कोरोनाच्या नव्या स्ट्रेनमुळं रुग्णसंख्येत भर पडताना दिसत आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार सिंगापूरमध्ये मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात कोरोनाच्या रुग्णांच्या संख्येत २८ टक्क्यांची वाढ झाली.

**आरोग्य तज्ज्ञांचं मोठं भाकीत**

सिंगापूरमध्ये कोरोनाचे नव्याने रुग्ण आढळल्यामुळे भारतात चिंता व्यक्त केली जात आहे. त्याबद्दल चिंता करण्याचं काही कारण नाही, २०२० मध्ये सुरु झालेली कोरोनाची लाट २०२२ मध्ये आटोक्यात आली. त्यावेळी कोरोनाचा विषाणू नष्ट झालेला नव्हता. त्यामुळे तो काही भागात डोकं वर काढेल असं जागतिक आरोग्य संघटनेने सांगितले होते. मात्र भारताबाबत बोलायचं झाल्यास, काळजी करण्याचं काही कारण नाही. हा विषाणू भारतामध्ये सर्व पातळीवर पसरणार नाही. आता कोरोनाचे जे नवे व्हेरियंट येत आहेत. ते फारसे मारक नाहीत. गेल्या चार वर्षात कोरोना संपला असं जाहीर झाल्यानंतर देखील भारतात एखादा दुसरा रुग्ण सापडत होता, आपल्या देशात कोरोनाचा थोड्या-फार प्रमाणात शिरकाव होऊ शकतो, मात्र लाट येईल असं काही वाटत नाही. हा विषाणू संशोधकांना प्राण्यांमध्ये देखील सापडला आहे, कोरोनाचा विषाणू नवा असो किंवा जुना उपाय तेच आहेत, तो पुन्हा येऊ शकतो, पण घाबरू जाऊ नका काळजी घ्या असं भोंडवे यांनी म्हटलं आहे.



**मुंबई । प्रतिनिधी :** आशियाई देशांमध्ये कोरोनाचा फैलाव होत असल्याच्या वृत्तानं पुन्हा एकदा खळबळ माजली असून, आता आरोग्य यंत्रणांनीसुद्धा खबरदारी बाळगण्यास सुरुवात केली आहे. उपलब्ध माहितीनुसार कोरोनाचा संसर्ग आता मुंबईतसुद्धा भीतीत भर घालताना दिसत आहे. मुंबईच्या केईएम रुग्णालयात दोन संशयित कोरोनाबाधितांचा मृत्यू झाला आहे, त्यामुळं शहरात कोरोनाचा शिरकाव झाला का? असा प्रश्न आता उपस्थित होतोय. दोन्ही रुग्णांच्या मृत्यूपूर्वी केलेल्या चाचणीमध्ये हे रुग्ण कोरोना बाधित असल्याचं स्पष्ट झाल्यानं भीती आणखी वाढत आहे. मात्र संशयित कोरोनाबाधित रुग्णांचा मृत्यू त्यांना असलेल्या सहव्याधीमुळं झाल्याचं स्पष्टीकरण केईएम रुग्णालयानं दिलं आहे. मृतांमध्ये ५८ वर्षीय महिलेचा कर्करोगामुळे आणि १३ वर्षीय मुलीचा मूत्रपिंडाच्या आजाराने मृत्यू झाला असल्याचं रुग्णालय प्रशासनाचं म्हणणं आहे. मुंबईच्या माजी महापौर किशोरी पेडणेकर यांनी या दोन रुग्णांचा मृत्यू कोरोनामुळं झाल्याचं म्हटल्यानं केईएम रुग्णालयातील या दोन रुग्णांचे रुग्णांचे मृत्यू नेमके कशामुळं झाले याबाबत संभ्रम निर्माण झाला असून, भीतीचं वातावरण पाहायला मिळत आहे. गेल्या दोन आठवड्यांमध्ये भारतही या संसर्गाच्या विळख्यात येत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. साधारण आठवडाभराची आकडेवारी पाहिल्यास देशात गेल्या आठवड्यात ५८ नव्या कोरोना बाधितांची नोंद करण्यात आली आहे. तर सक्रिय कोरोना रुग्णांची संख्या आता ९३ वर पोहोचली आहे. भारतात कोरोना चाचण्यांची संख्या कमी असतानाही रुग्णसंख्या वाढलेल्यानं आरोग्य यंत्रणांची चिंता वाढली आहे. दरम्यान या परिस्थितीमध्ये घाबरण्याऐवजी सतर्क राहण्याचं आवाहन आरोग्य तज्ज्ञ आणि डॉक्टरांनी केलं आहे.

## जळगावात भाजप आमदाराचा पोलीस कर्मचाऱ्यावर ३ लाखांची खंडणीचा आरोप



**जळगावच्या चाळीसगाव शहर पोलिसांवर भाजप आमदार मंगेश चव्हाण गंभीर आरोप केले आहे. एका गुन्ह्यातून नाव वगळण्यासाठी एका तरुणांकडून पोलीस कर्मचाऱ्यांनी ३ लाख रुपयांची खंडणी मागितली, असा आरोप मंगेश चव्हाण यांनी केला आहे. त्यानंतर तडजोडीनंतर पोलिसांनी एक लाख रुपये घेतल्याचा आरोप मंगेश चव्हाण यांनी केला आहे.**

**बीड । प्रतिनिधी :** जळगाव जिल्ह्यात पोलीस कर्मचाऱ्यावर खंडणी घेतल्याचा आरोप झाला आहे. एका गुन्ह्यातून नाव कमी करण्यासाठी पोलीस कर्मचाऱ्याने तीन लाख रुपये मागितले. तडजोडीनंतर एक लाख रुपये घेतले, असा आरोप भारतीय जनता पक्षाचे आमदार मंगेश चव्हाण यांनी केला आहे. त्या पोलीस कर्मचाऱ्यावर गुन्हा दाखल करुन त्याला अटक करण्याच्या मागणीसाठी आमदार मंगेश चव्हाण यांनी पोलीस ठाण्यातच ठिय्या सुरु केला आहे. जोपर्यंत गुन्हा दाखल होत नाही, तोपर्यंत पोलीस ठाणे सोडणार नाही, असा पवित्रा आमदार मंगेश चव्हाण यांनी घेतला आहे. यासंदर्भात पोलीस अधिकाऱ्यासमोर बसून आमदारांनी पैसे देणाऱ्या युवकाशी संवाद साधला. त्यावेळी पोलीस अधिकाऱ्याने कारवाई करण्याचे आश्वासन आमदार मंगेश चव्हाण यांना दिले. परंतु जोपर्यंत खंडणी घेणाऱ्या पोलिसावर गुन्हा दाखल होत नाही, तोपर्यंत पोलीस स्टेशनची पायरी उतरणार नाही, असा पवित्रच मंगेश चव्हाण यांनी घेतला आहे. खंडणीखोर पोलिसांवर गुन्हा दाखल करून अटक करा, अशी मागणी भाजप आमदार मंगेश चव्हाण यांनी करत पोलीस ठाण्यात ठिय्या सुरु केला आहे. आमदार मंगेश चव्हाण हे चाळीसगाव शहर पोलीस ठाण्यात तळ ठोकून बसले आहेत. यावेळी पोलीस अधिकाऱ्याशी संवाद साधताना आमदार चव्हाण म्हणाले, आताच्या आता त्या पोलीस कर्मचाऱ्यावर खंडणीचा गुन्हा दाखल करा, त्याला अटक करा. पोलीस ठाण्याजवळ अनेक अवैध व्यवसाय सुरु आहे. त्यासंदर्भात कारवाई का होत नाही? असा प्रश्नही आमदार चव्हाण यांनी विचारला. काही दिवसांपूर्वी आमदार मंगेश चव्हाण यांनी शेतकऱ्यांकडून पैसे घेतले जात असल्याचा आरोप करत पंचायत समितीत कर्मचाऱ्यांना जाब विचारला होता. लाभार्थी शेतकऱ्यांनी पंचायत समितीचे कर्मचारी विहिरीचे अनुदान मंजूर करताना वीस ते तीस हजार रुपयांची मागणी करतात, अशी तक्रार आमदार चव्हाण यांच्याकडे आली होती. त्यानंतर पंचायत समिती गाठत दोन दिवसांत कर्मचाऱ्यांवर कारवाई करा, अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा दिला होता.

## राज्यात पुढचे पाच दिवस पावसाचा धुमाकूळ!!!



**मान्सूनच आगमनासाठी अरबी समुद्रात पूरक स्थिती निर्माण होत असतानाच देशात आता मान्सून पूर्व पावसाने हजेरी लावण्यास सुरुवात केली आहे. तर, हा पाऊस महाराष्ट्रात मात्र आतापासूनच धुमाकूळ घालताना दिसत आहे. त्याच धर्तीवर हवामान विभागानं पुढील चार ते पाच दिवस राज्यात वादळी पावसाची हजेरी असेल असा इशारा जारी केला आहे. प्रामुख्यानं नाशिक, अहिल्यानगर, सातारा, पुणे, कोल्हापूर या भागांना वादळी पावसाचा तडाखा बसेल. तर, विदर्भ, मराठवाडा आणि कोकण पट्टासुद्धा या पावसापासून बचाव करू शकणार नाहीय.**

**मुंबई । प्रतिनिधी :** मुंबई, मध्य महाराष्ट्र आणि कोकण पट्ट्यामध्ये गेल्या २४ तासांपासून पावसानं हजेरी लावल्याचं पाहायला मिळालं आहे. पश्चिम महाराष्ट्रातही ही स्थिती कायम राहणार असून, पुढील पाट दिवसांमध्ये राज्याच्या बहुतांश भागांमध्ये पवासाचीच हजेरी असेल असा स्पष्ट इशारा हवामान विभागानं जारी केला आहे. मेघगर्जनेसह आणि विजांच्या कडकडाटासह राज्यात जोरदार पाऊस बरसणार असल्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. यादरम्यान कोकणासह मध्य महाराष्ट्रात अतिमुसळधार पावसाचा 'ऑरेंज अलर्ट'सुद्धा जारी करण्यात आला आहे. तर, विदर्भातही काही ठिकाणी पाऊस जोरदार बरसणार असल्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. सध्याच्या घडीला गुजरात आणि उत्तर कोकणच्या किनाऱ्यालगत अरबी समुद्रात चक्राकार वारे वाहत आहेत. याच वाऱ्यांची दिशा आणि त्यांचा वेग पाहता परिणामस्वरुप सध्या राज्यात पावसाला पोषक वातावरण निर्माण होताना दिसत आहे. हा पाऊस आणि हे पावसाळी वातावरण इतक्यात पाठ सोडणार नसून किमान २१ मे पर्यंत पावसाचा जोर वाढणार असल्याचा प्राथमिक अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## 'वन नेशन, वन इलेक्शन' घेतल्यास ५ हजार कोटींचा फायदा
### केंद्रीय समितीची महाराष्ट्रातील राजकीय पक्षांशी चर्चा



**मुंबई । प्रतिनिधी :** वन नेशन वन इलेक्शन संदर्भात संसदेची समिती दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यावर आली होती. या समितीच्या अध्यक्षपदी खासदार पी.पी. चौधरी असून वन नेशन वन इलेक्शन संदर्भाने देशातील सर्वच राज्यांचा दौरा ही समिती करत आहे. या समितीच्या माध्यमातून प्रादेशिक राजकीय पक्षांच्या प्रमुखांशी, प्रतिनिधींशी चर्चा केली जात आहे. त्याच अनुषंगाने या समितीने मुंबई दौऱ्यात महाराष्ट्रातील राजकीय पक्षांच्या प्रमुखांसोबत चर्चा केली. विशेष म्हणजे शिवसेना युबीटी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी देखील पुस्तक प्रकाशन सोहळ्याचा या समितीचा उल्लेख केला होता. आता, समितीचे प्रमुख पीपी चौधरी यांनी दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यानंतर पत्रकार परिषद घेऊन माहिती दिली. तत्पूर्वी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत संयुक्त संसदीय समितीचे अध्यक्ष खासदार पीपी चौधरी आणि समितीच्या इतर सदस्यांसमवेत 'संविधान (१२९वी सुधारणा) विधेयक २०२४ आणि केंद्रशासित प्रदेश कायदा (सुधारणा) विधेयक २०२४'वर बैठक घेण्यात आली होती. गेल्या दोन दिवसांत राज्यातील विधान परिषद विरोधी पक्षनेते, सीएम, डीसीएम यांच्यासह अनेक नेत्यांसोबत समितीने चर्चा केली आहे. देश हिताचा विचार करुन वन नेशन वन इलेक्शन कसे फायद्याचे राहील यासंदर्भात चर्चा झाली. एकाचवेळी निवडणुका झाल्या तर आर्थिक विकासात 5 हजार कोटींचा फायदा होईल. सध्या सरकार 15 हजार कोटी रुपये खर्च करत असून तो खर्च वाचल्यास त्यातून पायाभूत सुविधा निर्माण होतील, विकासाला गती मिळेल, असे चौधरी यांनी पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले. एकाचवेळी निवडणूका झाल्या तर पाच वर्ष निश्चित सरकार राहिल, त्यामुळे गुंतवणूक करणाऱ्या उद्योजकांनाही फायदा होईल. निवडणुका सातत्याने असल्याने शिक्षकांनाही ड्युट्या लागतात, त्याचा परिणाम शालेय शिक्षणावर होतो, अशी बाबही या समितीने निदर्शनास आणून दिली. लोकशाहीत एकाच वेळी निवडणूक घ्यावी यावर राजकीय मतमतांतरे असू शकतात, पण लोकशाहीत चांगल्या गोष्टी विचार करावा लागतो, असेही चौधरी यांनी म्हटले.

३० राज्यात दौरा, पारदर्शक रिपोर्ट सादर करू समितीसमोर वेगवेगळ्या सूचना येत आहेत, आम्ही त्या सूचना संसदेत मांडू, तिथे त्यावर चर्चा होईल.मात्र, विधानसभा आणि लोकसभा निवडणुका एकत्र व्हाव्यात असा पहिला विचार आहे. त्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांचा विचार केला जाईल, अशी माहितीही चौधरी यांनी दिली. दरम्यान, देशातील 30 राज्यात आमची समिती जाईल, तिथल्या लोकप्रतिनिधींच्या सूचना विचारात घेऊन पारदर्शक पद्धतीने रिपोर्ट सादर करू, असेही समितीचे अध्यक्ष चौधरी यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

## महिलेच्या अंत्यविधीनंतर अस्थी व रक्षा गायब
### सोन्यासाठी चोरी की अघोरी प्रकार?



**नाशिक । प्रतिनिधी :** सटाणा तालुक्यातील नामपूर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कारानंतर राख व अस्थी गायब झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मृत महिलेचे नातेवाईक रक्षा विसर्जनासाठी जेव्हा स्मशानभूमीत पोहोचले, तेव्हा त्यांना राख व अस्थी गायब असल्याचे लक्षात आले.

सुरेखा दीपक खैरनार (वय ४०) यांचे निधन झाल्यानंतर त्यांच्यावर नामपूर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले होते. मात्र दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजता नातेवाईक अस्थी संकलनासाठी स्मशानात गेले असता राख व अस्थी गायब असल्याचे आढळून आले.

**दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी**

या धक्कादायक घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. याआधीही अशा घटना घडल्याचा नागरिकांचा आरोप आहे. ग्रामपंचायत व पोलीस प्रशासन याकडे दुर्लक्ष करत असल्याचीही टीका करण्यात येत आहे. स्मशानभूमीत सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, संरक्षक भिंतीची उभारणी करावी, नशेखोरी व अघोरी प्रकारांना आळा घालावा तसेच या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

**चोरी की अघोरी प्रकार?**

राखेत सोन्याचे दागिने असल्यामुळे चोरट्यांनी ही चोरी केली असावी, असा संशय नातेवाईकांनी व्यक्त केला आहे. मात्र हा प्रकार केवळ चोरीपुरता मर्यादित आहे की अघोरी कृत्याशी संबंधित आहे? याबाबत अद्याप स्पष्टता नाही. हिंदू परंपरेनुसार विवाहित महिलेला अंत्यसंस्कारावेळी दागिने घालण्याची प्रथा आहे, त्यामुळे अनेक वेळा राखेत दागिने सापडतात.

## पोलीस उपनिरीक्षकाचे पोलीस महिलेसह धक्कादायक कृत्य . लैंगिक अत्याचार करत नग्न फोटो काढले आणि...



**नवी मुंबई । प्रतिनिधी :** महाराष्ट्रात एक धक्कादायक घटना घडली आहे. पोलीस उपनिरीक्षकाने पोलीस महिलेसह धक्कादायक कृत्य केले आहे. या पोलिस उपनिरीक्षकाने या महिलेवर लैंगिक अत्याचार करत तिचे नग्न फोटो देखील काढले. या प्रकरणी पोलिस उपनिकीक्षकासह त्याच्या आईवर देखील गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नवी मुंबईतील पनवेलमध्ये महिला पोलीस कर्मचारीला गुंगीचे औषधं देऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार आणि जातीवाचक शिवीगाळ केल्याप्रकारणी पोलीस उपनिरीक्षका विरोधात गुन्हा दाखल करण्यात आलाय. २०२० साली नेरे येथे महिला पोलीसवर गुंगीचे औषधं टाकून लैंगिक अत्याचार करुन अर्धनग्न फोटो देखील काढून ठेवण्यात आले होते. सदर फोटो वायरल करण्याची धमकी देत तसेच लग्नाचे आमिष दाखवत मागील पाच वर्षांपासून आरोपी पोलीस उपनिरीक्षक जबरदस्तीने लैंगिक अत्याचार करत होता. याप्रकरणी आरोपी पोलीस उपनिरीक्षक कृष्णा कुटे आणि त्याची आई इंदुबाई कुटे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चाकण टकळमध्ये एका नराधमानं कंपनीत जाणाऱ्या एका महिलेवर लैंगिक अत्याचार केलाय. १३ मे च्या रात्री ११ च्या सुमारास ही धक्कादायक घटना घडली. या प्रकरणी नराधम प्रकाश भांगरेला २४ तासांत अटक करण्यात आलीये.. पीडित महिला एका कंपनीमध्ये हेल्परचं काम करते.. घटनेच्या दिवसी ती रात्री साडेअकराच्या सुमारास कामावर निघाली होती. मेदनकरवाडी येथील कंपनीच्या जवळ येताच नराधमानं तिला जबरदस्तीनं ओढत नेलं आणि तिच्यावर अत्याचार केला.. त्यानंतर तिला मारहाण करुन ठार मारण्याची धमकीही दिली.. त्यानंतर आरोपी फरार झाला.. स्थानिकांच्या मदतीनं पीडित महिलेनं पोलिसांत तक्रार दाखल केली. त्यानंतर सीसीटीव्हीच्या मदतीनं पोलिसांनी २४ तासांतच या नराधमाला बेड्या ठोकल्यात. आरोपी हा मूळचा अहिल्यानगरच्या अकोले गावचा आहे. त्यानं याआधीही असं कृत्य केलं आहे का याचा तपास पोलीस करत आहेत.

# या व्यक्तींनी खाऊ नये बीट

बीट हे आपल्या आरोग्यासाठी अत्यंत पौष्टिक असते. बीट खाण्याचे अनेक फायदे देखील आहेत. बीटचे सेवन जास्त प्रमाणात केल्याने शरीरात रक्ताची कमतरता असेल, तर ही समस्या दूर होते. बिटामध्ये मोठ्या प्रमाणात जीवनसत्त्व अ, व क, फायबर, सोडियम, पोटॅशियम, फॉस्फरस, क्लोरिन, आयोडीन, लोह व नैसर्गिक साखर या घटकांनी समृद्ध असते.परंतु काही लोकांसाठी बिटाचे सेवन अतिशय घातक ठरू शकते. आज आपण जाणून घेऊया कोणत्या लोकांनी बिटाचे सेवन करू नये.

**1. पोटाशी संबंधित समस्या :**

जर तुम्हाला पोटाचे विकार असतील तर, बिटाचे सेवन कमी प्रमाणात करावे. जास्त बीटचे सेवन केल्याने पोटाशी संबंधित समस्या उद्भवू शकतात.

**2. गर्भवती महिलांनी बीट कमी प्रमाणात खावे :**

बिटामध्ये नैसर्गिकरित्या ऑक्सलेट्स नावाचे घटक असतात, ज्याचे अधिक सेवन केल्यास मूत्रपिंडातील दगड होण्याची म्हणजेच स्टोन होण्याची शक्यता वाढू शकते.



**3. यकृतासाठी बिटाचं सेवन ठरू शकते धोकादायक :**

बिटामध्ये असलेली खनिजे यकृतामध्ये जमा होऊ शकतात. बीटमध्ये ऑक्सालेट्स आणि खनिजे जसे की लोह, कॅल्शियम इत्यादी भरपूर प्रमाणात असतात. या खनिजांचे जास्त प्रमाणात सेवन केल्यास, हे खनिज यकृतामध्ये साचण्याची शक्यता असते, ज्यामुळे यकृताचे कार्य प्रभावित होऊ शकते.

**4. मधुमेह होण्याचा धोका :**

बिटामध्ये मोठ्या प्रमाणात साखरेचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे मधुमेह रुग्णांनी बिटाचे सेवन करू नये.

**5. एलर्जी :**

जर तुम्हाला बिटाची एलर्जी असेल तर बिटाचे सेवन करू नये. यामुळे शरीरावर रॅशेस किंवा पुरळ, खाज येऊ शकते.

# एक्स्पायरी डेटनंतर दूध प्यायल्यास काय होईल ?

आपल्यापैकी अनेक जण आधी एक्स्पायरी डेट बघतात आणि मगच अन्नपदार्थ खातात. परंतु कधीकधी चुकून एखादा पदार्थ एक्स्पायरी डेट न पाहता खाल्ला गेला तर मात्र काळजी वाटू लागते. की काही गडबड तर होणार नाही ना? जर पाकिटवालं दूध असेल तर त्यावर त्याची एक्सपायरी डेट लिहिलेली असते. कधीकधी ही एक्स्पायरी डेट निघून जाते आणि आपल्याला प्रश्न पडतो की एक्स्पायरी डेट निघून गेलेले दूध प्यावे की नाही ? की ते कुत्रा-मांजरीला खायला द्यावे ? एक्स्पर्टसच्या म्हणण्यानुसार, एक्स्पायरी डेट निघून गेल्यानंतर एक किंवा दोन दिवसांनी असे अन्नपदार्थ खाल्ले तर फार नुकसान होत नाही. परंतु काही केसेसमध्ये मोठमोठे आजार झाले असल्याचंही लक्षात आलंय. त्यामुळे खाल्ल्यानंतर ताबडतोब काहीच झालं नाही पण भविष्यात काही झालं तर ? असाही प्रश्न कधीकधी पडतो.



बरेच लोक ठरवू शकत नाहीत की पाकिटवालं दूध फेकावं की वापरावं? यावर फूड एक्सपर्टस म्हणतात, काहीवेळेस एक्स्पायरी डेट उलटल्यानंतर एकदोन दिवसांपर्यंत दूध पिणे वाईट नाही. पण हे ऋतूवर अवलंबून आहे. जर तुम्ही हिवाळ्यात एक्स्पायरी डेटनंतर दूध वापरत असाल तर असं होऊ शकतं की दूध फाटणार नाही. जर दूध फाटलं नसेल तर तुम्ही हे दूध पिऊ शकता. पण जर दूध फाटलं असेल तर त्याला फेकून देणंच योग्य राहिल. एका फूड एक्सपर्टच्या म्हणण्यानुसार, अन्नपदार्थ एक्स्पायरी डेटच्या एक-दोन दिवसांनंतर खाल्ल्याने काही समस्या निर्माण होत नाही. यामुळेच कंपन्या एकदोन दिवस आधीचीच डेट लिहितात जेणेकरुन ग्राहक सतर्क राहू शकतील. काही बाबतीत अन्नपदार्थांवर लिहिण्यात आलेली एक्स्पायरी डेट गोंधळवून टाकणारी असू शकते.

एक्स्पायरी डेट पार करुनही जर दूध फाटलं नसेल तरीसुद्धा तुम्ही हे दूध तुमच्या मुलांना देऊ नका. या दुधामुळे मुलांच्या शरीरात हानिकारक बॅक्टेरिया निर्माण होऊ शकतात. यामुळे उलटी, ताप असे आजार होऊ शकतात. जर तुम्ही कुत्रा-मांजरीला हे दूध द्यायचं म्हणत असाल तर त्याचेही साईड इफेक्टस असू शकतात.

साधारणपणे, खाद्यपदार्थांवर तीन प्रकारच्या तारखा लिहिलेल्या असतात. यात बेस्ट इफ युज बाय डेट, द सेल बाय डेट आणि युज बाय डेट अशा तारखांचा समावेश असतो. यावरुन माहिती मिळते की तुम्ही तो खाद्यपदार्थ कधीपर्यंत खाऊ शकता. जर तुम्ही बेस्ट बीफोर किंवा एक्स्पायरी डेट उलटल्यानंतर काही दिवस अन्नपदार्थांचं सेवन करत असाल तर तुम्हाला काही होणार नाही. पण दुसऱ्या प्रोडक्टच्या तुलनेत दुधाच्या बाबतीत सावधागिरी बाळगणं गरजेचं आहे.

# मुलांच्या संगोपनासाठी पाळा रविशंकर यांचा मूलमंत्र

मुलांचं संगोपन करत असताना आईवडिलांना खूप काळजी घ्यावी लागते. यातच जर एखादी चूक झाली तर खूप मोठी समस्या निर्माण होऊ शकते. मुलांच्या पालनपोषणामध्ये आईवडील एक्सपर्टस आणि मोटिव्हेशनल स्पीकर्सचा सल्ला घेण्यालाही प्राधान्य देतात. मुलांच्या संगोपनाबाबत अध्यात्मिक गुरु श्री श्री रवि शंकर यांनीदेखील मार्गदर्शन केलं आहे. जाणून घेऊयात त्यांनी केलेल्या मार्गदर्शनाबाबत.

जेव्हा आपण मुलांसोबत बोलत असतो किंवा त्यांना शिक्षा देतो, तेव्हा त्यांना नकारात्मक सूचना दिल्या जातात. परंतु आपण लक्षात घ्यायला हवं की त्यांना नेहमी सकारात्मक सूचना द्यायला हव्यात. उदाहरणार्थ, 'तिथे जाऊ नकोस' सांगण्याऐवजी 'इथे ये' असं तुम्ही सांगू शकता. याचप्रकारे, 'बाटली फेकू नको' सांगण्याऐवजी 'बाटली इथे ठेव' असंही सांगता येऊ शकेल. जर तुम्ही तुमच्या सूचनांना नकारात्मकतेपासून सकारात्मक बनवण्याचा प्रयत्न करत असाल तर मुलांसाठी हे अधिक सकारात्मक आणि प्रोत्साहनपर ठरु शकेल. या दृष्टिकोनामुळे केवळ मुलांच्या वागण्यात बदल होईल आणि ते अधिक आशावादी बनतील.

'मुलं ही देवाघरची फुलं' असतात असं म्हटलं जातं. मुलं केवळ आपल्या जिवनात आनंदच आणत नाहीत तर त्यांना मोठं करत असताना आईवडिलांना आलेले अनुभव आईवडिलांना अनेक गोष्टी शिकवतात, समृद्ध करतात. या प्रक्रियेदरम्यान आईवडिल अधिक सहानुभूतीशील, अधिक धैर्यवान बनत असतात. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे त्यांना त्यांच्या या लहान लहान मुलांवर संस्कार घडवायचे असतात, त्यांना प्रेम द्यायचं असतं. या संपूर्ण काळात आईवडील ईश्वराची भूमिका निभावत असतात. मुलं आपल्या आजूबाजूच्या गोष्टींचं खूप निरीक्षण करत असतात. ते प्रत्येक गोष्ट खूप बारकाईने पाहतात. बहुतांश वेळा आईवडिलांचं याकडे लक्ष नसतं की त्यांची मुलं त्यांच्याकडे पाहूनच शिकत असतात. यासाठीच आईवडिलांनी तणावमुक्त रहायला हवे. कारण आईवडिलांचा आनंद, त्यांचा तणाव, त्यांचा स्वभाव आणि त्यांचा दृष्टिकोन याचा मुलांवर परिणाम होत असतो.

जेव्हा आईवडील तणावात असतात तेव्हा मुलांवरही त्याचा प्रभाव पडत असतो आणि जेव्हा ते आनंदी असतात तेव्हा मुलांवर त्याचा सकारात्मक प्रभाव पडतो. यासाठीच मुलांच्या संपूर्ण विकासासाठी



# दबाव टाकल्याने बिघडू शकते मुलांचे मानसिक आरोग्य

काही वेळा आपण असं पाहतो की आईवडील किंवा समाज लहान मुलांवर अधिकच दबाव टाकतात. मुलं जर वाईट मार्गाने जात असतील तर त्यांना समजवण्याची जबाबदारी परिवार आणि आईवडिलांवर असते. खरंतर त्यांच्यावर दबाव टाकल्याने मुलांच्या मानसिक विकासावर परिणाम होऊ शकतो. ज्यामुळे त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. अशात जर तुम्हीदेखील तुमच्या मुलांवर दबाव टाकत असाल तर तुम्हाला वेळीच सावध झालं पाहिजे.

**तणाव आणि चिंतेचे शिकार :**

जेव्हा तुम्ही कमी वयाच्या मुलांवर जास्त दबाव टाकता तेव्हा मुलांच्या चिंतेत वाढ होते. हे त्यांच्या मानसिक विकासासाठी हानिकारक ठरु शकते.

**आत्मविश्वास कमी होऊ शकतो :**

जास्त दबाव टाकल्याने मुलं स्वतःचा निर्णय स्वतः घेऊ शकत नाहीत. यामुळे त्यांचा आत्मविश्वास कमी होतो आणि ते स्वतःला इतरांपेक्षा कमजोर समजू लागतात. ही आत्मविश्वासामधली कमतरता पुढे जाऊन त्यांच्या वैयक्तिक आणि सामाजिक जीवनाला प्रभावित करु शकते.

**प्रोत्साहन आहे गरजेचे :**

लहान मुलांना समजवण्याचा प्रयत्न करा. जर ते चुकीचे वागत असतील तर त्यांना चूक काय, बरोबर काय यातील फरक समजावून सांगा. जर तुम्ही त्यांना ओरडत असाल, त्यांच्याशी मोठ्या आवाजात बोलत असाल तर ते चुकीचं आहे. मुलांना त्यांच्या क्षमतेनुसार प्रोत्साहित करा. त्यांना त्यांच्या वयानुसार खेळण्याची, मस्ती करण्याची आणि जीवनाचा आनंद घेण्याची परवानगी द्या. त्यांच्यावर फार बंधने लादू नका.

# प्या हे ड्रिंक्स स्ट्रेस दूर करण्यासाठी

बदलत्या लाइफस्टाइलनूसार स्ट्रेस आता आयुष्याचा एक भाग झाला आहे. कोणाला अभ्यासाचे तर कोणाला कामाचा स्ट्रेस आहे. याच स्ट्रेसपासून मुक्तता होण्यासाठी काहीजण चहा किंवा कॉफीचा आधार घेतात. पण, जास्त प्रमाणात चहा आणि कॉफी पिणे आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते. अशावेळी, स्ट्रेसपासून मुक्तता होण्यासाठी तुम्हाला काही ड्रिंक्स पिणे फायदेशीर ठरू शकते. जाणून घेऊयात, स्ट्रेस दूर करण्यासाठी कोणते ड्रिंक्स प्यायला हवेत.

**हळदीचे दूध –**

हळदीचे दूध स्ट्रेस दूर करण्यासाठी एक रामबाण उपाय आहे. हळदीचे दूध तयार करण्यासाठी कोमट दूधात 1 चमचा हळद टाकून मिक्स करून घ्यावे. हळदीत असणारे अँटी-ऑक्सीडंट आणि अँटी इम्फलिमेटरी गुणधर्म शरीराला आराम देण्यासाठी फायदेशीर आहे. तर दूधात असणारा ट्राइप्टोफैन घटक डोक्यातील सेरोटोनिनचे उत्पादन वाढवण्यासाठी फायदेशीर ठरतात. ज्यामुळे मुड सुधारण्यासाठी मदत होते.

**दालचिनी चहा –**

धकाधकीच्या आयुष्यातील स्ट्रेस दूर करण्यासाठी तुम्ही दालचिनीचा चहा प्यायला हवा. दालचिनीचा सुगंध डोके आणि मन शांत करण्यासाठी उपयुक्त ठरतो. दालचिनीचा चहा बनवण्यासाठी तुम्ही एक कप पाण्यात दालचिनीची पावडर उकळवून घ्या. स्ट्रेस दूर करण्यासाठी तुम्हाला दालचिनीचा चहा पिणे फायद्याचे ठरेल.

**वेलची ड्रिंक–**

स्ट्रेस दूर करण्यासाठी तुम्ही वेलचीचे ड्रिंक प्यायला हवा. वेलचीचे पाणी तयार करण्यासाठी एक कप पाण्याच २ वेलची उकळवून घ्या. तयार पाणी तुम्हाला घोटघोट प्यायचे आहे. याने तुम्हाला नक्कीच फायदा मिळेल कारण वेलचीमध्ये असणारे अँटी-ऑक्सीडंट आणि अँटी इम्फलिमेटरी गुणधर्म डोके आणि मनाला शांत करण्यासाठी फायदेशीर ठरतात.

**ग्रीन ट्री –**

स्ट्रेस दूर करण्यासाठी ग्रीन ट्री प्यायला हवी. ग्रीन ट्रीमध्ये असणारे अँटी-ऑक्सीडंट डोके शांत करण्यासाठी



# पदार्थ पॅक करण्यासाठी फॉईल पेपर वापरावा की बटर पेपर?




शाळेचा डब्बा असो वा ऑफीसचा टिफीन खाद्यपदार्थ पॅक करण्यासाठी फॉईल पेपर किंवा बटर पेपरचा वापर सर्रासपणे केला जातो. पोळी असो वा भाकरी फॉईल पेपरमध्ये ठेवल्यास गरम राहते. पण, तुम्हाला हे ठाऊक आहे का? पदार्थ पॅक करण्यासाठी फॉईल पेपर किंवा बटर पेपर वापरणे आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते. खरं तर, तज्ञ फॉईल पेपर आणि बटर पेपर पदार्थ पॅक करण्यासाठी वापरू नये, असा सल्ला देतात. पण, जर वापरायचा असेल तर जाणून घेऊयात पदार्थ पॅक करण्यासाठी फॉईल पेपर वापरावा की बटर पेपर,

**फॉईल पेपर की बटर पेपर?**

पदार्थ पॅक करण्यासाठी फॉईल पेपरच्या तुलनेत तुम्ही बटर पेपर वापरायला हवा. कारण, पदार्थ पॅक करण्यासाठी फॉईल पेपरचा वापर करणे हानिकारक ठरू शकते. खरं तर, बटर पेपर सेल्युलोज पासून तयार केला जातो. ज्यामुळे खाद्यपदाथार्तील अतिरीक्त तेल शोषून घेण्यास मदत होते. त्यामुळे आरोग्याच्या दृष्टीने हा उत्तम पर्याय आहे. आपण बऱ्याचदा पाहिले असेल की, हॉटेल्समध्ये पार्सल किंवा पदार्थ देण्यासाठी बटर पेपरचा वापर केला जातो. तुम्हाला जर खारट किंवा मसालेदार पदार्थ पॅक करायचे असतील तर तुम्ही बटर पेपरचा वापर करायला हवा.

**फॉईल पेपर वापरण्याचे दुष्परिणाम –**

ॲल्युमिनीयम फॉईलमध्ये चुकूनही पदार्थ पॅक करू नये, कारण फॉईलमध्ये असलेले कण आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकतात. ॲल्युमिनीयम फॉईलमध्ये व्हिटॅमिन सी असलेले पदार्थ आणि गरमा गरम पदार्थ तर चुकूनही ठेवू नयेत. जर तुम्ही फॉईलमध्ये गरम पदार्थ ठेवलेत तर फॉईल विरघळण्याची शक्यता असते. ज्यामुळे पोटाचे आरोग्य, मेंदूचे आरोग्य आणि हाडांचे आरोग्य

# रिकाम्यापोटी कडीपत्ता खाण्याचे आरोग्यदायी फायदे

पदाथार्ची चव वाढविण्यासाठी कडीपत्त्याची फोडणी दिली जाते. विविध पदार्थामध्ये केवळ सुगंधासाठी कढीपत्त्याचा वापर केला जातो. पण, तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की, पदाथार्ची चव वाढविणारा कढीपत्ता आरोग्यासाठी फायदेशीर आहे. आरोग्याच्या विविध समस्या, हेल्दी त्वचा ते केसांच्या तक्रारी यासाठी कडीपत्ता खाणे फायदेशीर आहे. पण, कडीपत्त्याचे सेवन जर तुम्ही रिकांम्या पोटी केलेत तर अधिक फायदेशीर आहे. कडीपत्ता व्हिटॅमिन्स, मिनरल्स, कॅल्शियम, आयर्न, झिंक अशा विविध पोषक तत्वांनी परिपूर्ण आहे.



त्यामुळे कडीपत्त्याचे सेवन करणे आरोग्यासाठी फायदेशीर ठरते.

बदलत्या लाइफस्टाईलनूसार वाढते वजन बऱ्याच जणांची डोकेदूखी ठरत आहे. अशावेळी नॅचरल पद्धतीने वजन कमी करण्यासाठी तुम्ही रिकाम्यापोटी कडीपत्ता खायला हवेत. कडीपत्त्याच्या सेवनाने भूक लागत नाही तर पोट दिर्घकाळ भरल्यासारखे राहते. परिणामी, तोंडावर ताबा राहून वजन नियंत्रणात राहते.

जर तुम्हाला पचनाच्या सबंधित तक्रारी वारंवार जाणवत असतील तर रिकाम्या पोटी कडीपत्त्याचे सेवन करायला हवे. कडीपत्ता केवळ आरोग्यासाठी नाही तर त्वचेच्या विविध समस्येवर प्रभावी ठरतो. कडीपत्त्याच्या सेवनाने त्वचा निरोगी राहण्यासाठी मदत होते. जर तुम्हाला वारंवार पुरळची समस्या जाणवत असेल तर काही दिवस सतत कडीपत्ता खा, नक्कीच फरक जाणवेल.

बदलत्या लाइफस्टाईलनूसार बरेच जण डायबिटीसच्या विळख्यात अडकले आहेत. त्यामुळे डायबिटीसच्या रूग्णांसाठी शुगर लेवल कंट्रोलमध्ये ठेवण्यासाठी रिकाम्यापोटी कडीपत्ता खाणे उपयुक्त ठरेल. रिकाम्यापोटी कडीपत्ता खाणे केसगळतीची समस्या कमी करू शकते. केवळ केसगळतीच नव्हे तर केसांच्या विविध तक्रारी कमी करण्यासाठी उपयुक्त ठरते. त्यामुळे निरोगी आरोग्यासाठी दररोज रिकाम्यापोटी कडीपत्ता अवश्य खायला हवा.

# केवळ स्वाद नव्हे तर गुणांनीही परिपूर्ण उसाचा रस

**उन्हाळ्याची** काहिली आता चांगलीच जाणवू लागली आहे आणि त्यामुळे साहजिकच लोकांची पावले आईस्क्रीम पार्लर, थंड पेये विकणाऱ्या दुकानांकडे वळू लागली आहेत. त्यातच उसाच्या गुऱ्हाळांनी म्हणजे रसवंतीगृहांनी त्यांचे संसार सुरू केले असून थंडगार, स्वादिष्ट आणि आले-लिंबू घालून केलेला गारेगार रस पिण्यासाठी गर्दी होऊ लागली आहे. उसापासून मिळणारा हा नैसर्गिक रस केवळ स्वादिष्टच नाही तर आरोग्यासाठी खूपच फायदेशीर आहे. अँटीऑक्सिडंटनी समृद्ध असा हा रस रोगप्रतिकारक शक्ती वाढविणारा आहे. आयर्न, मॅग्नेशियम, कॅल्शियम व अन्य इलेक्ट्रोलाईट्सचे प्रमाण या रसात पुरेसे असते, त्यामुळे डीहायड्रेशन झालेल्यांना रस पिणे फार उपयुक्त ठरते. सर्वसामान्य सर्दी आणि अन्य किरकोळ साथीचे आजार रोखण्यास रस पिणे फायद्याचे आहे तसेच ताप उतरवण्यासाठी सुद्धा रस पिण्याचा उपयोग होतो कारण उसाचा रस शरीरात प्रोटीनची पातळी वाढवितो. उसाच्या रसात कर्बोदके, प्रथिने, शिवाय आयर्न, पोटॅशियम अधिक मात्रेत असते यामुळेएक ग्लास उसाचा रस शरीरातील ऊर्जेची पातळी वाढवितो आणि शरीराचा थकवा दूर करतो. रक्तातील प्लाझ्मा आणि अन्य तरल पदार्थ वाढवितो. मूत्रपिंडाच्या विकारात म्हणजे किडनी स्टोनमध्ये रस पिणे फायद्याचे आहे. तसेच हा रस दात किडणे आणि श्वास दुर्गंधी रोखणारा आहे. यकृत म्हणजे लिव्हरला बळ देणारा असल्याने कावीळ झाल्यास उसाचा रस द्यावा, असे सांगितले जाते. आयुर्वेदानुसार उसाच्या रसाचे सेवन बद्धकोष्ठता दूर करणारे आहे आणि रसात असलेल्या क्षारांमुळे पित्त, पोटातील जळजळ दूर होते. उसाच्या रसात ए तसेच सर्व प्रकारची बी व्हिटॅमिन्स असतात, म्हणूनही उसाचा रस आरोग्यवर्धक ठरतो. फक्त रसवंतीगृहात रस पिताना उघड्यावरच बर्फ घालणे टाळावे तसेच रसवंतीगृहाची तेथील ग्लास, रस पिळणारे चरक यांची स्वच्छता आहे याची खात्री करून घ्यावी.



पोलीस बातमी पत्र
महामुंबई


मुंबई, मंगळवार, २७ मे ते २ जून २०२५

# संपादकीय

# न्यायप्रविष्ट आणि अभिव्यक्तीचा नवा अन्वयार्थ



संपादक दिपक मोरेश्वर नाईक



देश म्हणून आपण खुल्या न्यायालयाचे तत्त्व अंगिकारले आहे. जर न्यायालयात काय घडते आहे, हे सर्वसामान्य लोकांना समजत असेल, तरच या खुल्या न्यायालयाच्या तत्त्वाला अर्थ आहे. न्यायालयांमध्ये लोकांच्या रोजच्या जगण्यावर परिणाम करणाऱ्या खटल्यांवर सुनावणी सुरू असेल, तर तिथे नक्की काय घडते आहे, हे समजून घेण्याचा नागरिकांना अधिकार आहे. हा अधिकार अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकाराशी सुसंगत आहे. कारण मुळात काय घडते आहे, हे समजून घेतल्याशिवाय अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकाराला काहीच अर्थ नाही, हे समजून घेतले पाहिजे. न्यायप्रविष्ट हा शब्द आपल्या सगळ्यांच्या परिचयाचा. अनेक राजकारण्यांकडून तो खूप वेळा वापरलाही जातो. एखाद्या विषयावर न्यायालयामध्ये खटला प्रलंबित असेल, तर त्याबद्दल कोणतेही मत व्यक्त करताना सावधपणा बाळगला जातो. शक्यतो मत व्यक्तच केले जात नाही. 'हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे, त्यामुळे सध्या काही मत व्यक्त करता येणार नाही', असे वाक्य राजकीय नेत्यांकडून पत्रकारांना ऐकवले जाते. न्यायदानाची प्रक्रिया सुरू असताना आपल्या मतामुळे त्यावर काही परिणाम व्हायला नको, हाच उद्देश यामागे असतो. गेल्या अनेक वर्षांपासून हेच सुरू आहे. पण सर्वोच्च न्यायालयाने नुकतेच एका खटल्यामध्ये या संदर्भात नवा दृष्टिकोन पुढे आणला. पत्रकार, माध्यमकर्मी, सोशल मीडियातील लेखक यांनी तो समजून घेतला पाहिजे. न्यायदानाची प्रक्रिया सुरू असताना काही पथ्ये पाळली जातात. त्याचे प्रमुख कारण न्यायाधीशांना त्यांचे काम करताना कोणत्याही बाहेरील दबावाचा सामना करायला लागू नये. निष्पक्षपातीपणे आणि कायद्यातील तरतुदींना धरून न्यायदानाचे काम त्यांना करता यावे. आपल्या देशातील लोकशाही व्यवस्थेमध्ये न्यायालयांचे स्वातंत्र्य परमोच्च आहे. त्यासाठी विविध तरतुदी राज्यघटनेमध्ये करण्यात आल्या आहेत. न्यायिक पुनर्विलोकनाचा अधिकार उच्च आणि सर्वोच्च न्यायालयांना देण्यात आला आहे. राज्यघटनेतील अनुच्छेद १४२ अनुसार 'संपूर्ण न्याय' करण्याची ताकद सर्वोच्च न्यायालयाला देण्यात आली आहे. या सगळ्यातून न्यायालयांचे स्वातंत्र्य अधोरेखित होते. त्याचवेळी राज्यघटनेतील अनुच्छेद १९ (१) (अ) मध्ये देशातील प्रत्येक नागरिकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिलेले आहे. लोकशाहीमध्ये अभिव्यक्तीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. जर लोकांना मुक्तपणे त्यांचे म्हणणे मांडता येत नसेल, तर त्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा उपयोग नाही. याच अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा संकोच उच्च न्यायालयाच्या एका निर्णयामुळे होत असल्याचे सांगत सर्वोच्च न्यायालयात एक खटला दाखल करण्यात आला होता. विकिमीडिया फाऊंडेशन विरुद्ध एएनआय मीडिया प्रायव्हेट लिमिटेड असा हा खटला. याच खटल्यावर सर्वोच्च न्यायालयाचे न्या. अभय ओक आणि न्या. उज्जल भूयान यांनी निकाल दिला. हे निकालपत्र लिहिताना न्यायालयाने जे विविध संदर्भ दिले, ते न्यायप्रविष्ट या शब्दांकडे बघण्याचा नवा दृष्टिकोन देणारे आहेत. मुळात एखादी गोष्ट न्यायालयात प्रलंबित असेल, तर त्यावर भाष्य का करू नये, हे आधी समजून घेतले पाहिजे. न्यायदानाची प्रक्रिया सुरू असताना त्या विषयावर भाष्य केल्याने पूर्वग्रह निर्माण होण्याची शक्यता असते. ज्याचा न्यायदानावर परिणाम होऊ शकतो. न्यायाधीश हासुद्धा एक माणूसच आहे. त्यामुळे इतर माणसांप्रमाणे बाह्य गोष्टींचा परिणाम होणे अपेक्षित असते. याचसाठी एखादा खटला न्यायप्रविष्ट असेल, तर त्यावर शक्यतो भाष्य केले जाऊ नये, हा प्रघात आहे.वर उल्लेख केलेल्या खटल्यामध्ये दिल्ली उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने विकिमीडिया फाऊंडेशनला आदेश दिले होते. या खटल्यासंदर्भात त्यांच्या व्यासपीठावर जे वेबपेज तयार करण्यात आले होते, त्यावर या खटल्यासंदर्भात विविध प्रतिक्रिया व्यक्त करण्यात येत होत्या. हा प्रकार न्यायप्रविष्ट खटल्यातील संकेतांच्या विरोधात आहे आणि न्यायालयाचा अवमान करण्यासारखा आहे, असे दिल्ली उच्च न्यायालयाने म्हटले होते. न्यायालयाच्या आदेशानंतर पुढील ३६ तासांच्या आत इंटरनेटवरून संबंधित वेबपेज हटविण्याचे आदेशात म्हटले होते. याच आदेशांना सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली उच्च न्यायालयाचा आदेश रद्दबातल ठरविला. हे करताना न्यायालयाने काही महत्त्वाची निरीक्षणे नोंदविली. एखादा खटला न्यायप्रविष्ट असेल, तरी त्याबद्दल माध्यमांमध्ये आणि सामान्य नागरिकांमध्ये सकारात्मक चर्चा घडली पाहिजे. लोकांमध्ये जी काही चर्चा होते, निरीक्षणे नोंदविली जातात, त्याबद्दल न्यायालयांनी कायम नकारात्मक भूमिका ठेवण्याची गरज नाही. शेवटी न्यायालये ही सुद्धा सार्वजनिक व्यवस्थेचाच एक भाग आहेत. देशातील लोकशाही आणि राज्यघटनेची चौकट टिकवून ठेवण्यासाठी माध्यमे आणि न्यायालये यांनी परस्परांना पूरक ठरेल, अशा पद्धतीने काम केले पाहिजे, असे मत सर्वोच्च न्यायालयाने नोंदविले. एखादा खटला न्यायप्रविष्ट असेल आणि त्या खटल्यामध्ये माध्यमांनी किंवा त्रयस्थांनी कोणतेही मत व्यक्त केले तर त्यातून न्यायदानाच्या प्रक्रियेमध्ये अडथळा निर्माण होण्याची शक्यता असेल, तरच संबंधित खटल्यामध्ये न्यायालय माध्यमांना किंवा त्रयस्थांना खटल्याचा निकाल लागेपर्यंत कोणतेही मत न व्यक्त करण्यासंदर्भात आदेश देऊ शकतात. हे आदेश अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकाराचा वापर निकालानंतर करण्यास संबंधितांना बांधील करतात. त्यामुळे जेव्हा खरंच त्याची गरज असेल, तेव्हाच न्यायालयाने त्याचा वापर केला पाहिजे. सरसकट सगळ्याच खटल्यामध्ये हा निकष लावता येणार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. काही वर्षांपूर्वी सर्वोच्च आणि उच्च न्यायलायतील ठराविक खंडपीठांपुढील न्यायालयाच्या कामकाजाचे थेट प्रक्षेपण करण्यास सुरुवात झाली. त्यावेळीही यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात एक याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेवरील सुनावणीवेळी न्यायालयाने थेट प्रक्षेपणाचे समर्थन केले होते. आपण खुल्या न्यायालयाचे तत्त्व अंगिकारले आहे. जर न्यायालयात काय घडते आहे, हे सर्वसामान्य लोकांना समजत असेल, तरच या खुल्या न्यायालयाच्या तत्त्वाला अर्थ आहे.न्यायालयांमध्ये लोकांच्या रोजच्या जगण्यावर परिणाम करर्णाया खटल्यांवर सुनावणी सुरू असेल, तर तिथे नक्की काय घडते आहे, हे समजून घेण्याचा नागरिकांना अधिकार आहे. हा अधिकार अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकाराशी सुसंगत आहे. कारण मुळात काय घडते आहे, हे समजून घेतल्याशिवाय अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकाराला काहीच अर्थ नाही, असेही निरीक्षण न्यायालयाने नोंदविले. प्रख्यात तत्त्ववेत्ता आणि कायदेतज्ज्ञ जेरेमी बेंथम यांनी न्यायालयाच्या कामकाजाची प्रसिद्धी करण्यामागे एका कारणाचा उल्लेख केला होता. ते कारण सुद्धा समजून घ्यायला हवे. न्यायाधीशांचा प्रामाणिकपणा टिकवून ठेवण्यासाठी न्यायालयाच्या कामकाजाची प्रसिद्धी व्हायला हवी, असे त्याने म्हटले होते. न्यायालयात काय घडते आहे, यावर माध्यमांमध्ये माहिती येत राहिली, तर त्याचा सकारात्मक परिणाम न्यायालयाच्या कामकाजावर होतो. यासाठी त्याची प्रसिद्धी व्हायलाच हवी, असे त्याने म्हटले होते.न्यायालयांमध्ये काय घडते, तिथे कामकाज कशा पद्धतीने चालते, कायद्याचा अन्वयार्थ कशा पद्धतीने लावला जातो, हे जर मुक्तपणे सामान्य नागरिकांना कळू दिले जात असेल, तर त्याचा उपयोग लोकांचा न्यायालयांवरील विश्वास वाढविण्यासाठी होतो. त्यासाठीच नागरिकांना न्यायालयांमध्ये जे काही घडते आहे, त्याबद्दल सकारात्मकपणे आणि मुद्देसूदपणे आपली मते मांडता आली पाहिजेत. जिथे गरज असेल तिथेच त्यावर निर्बंध लादले गेले पाहिजेत, असे सर्वोच्च न्यायालयाच्या निकालातून दिसून येते. जर कोणी हेतूपूर्वक न्यायालयांना बदनाम करण्यासाठी त्यांच्यावर निराधार आरोप करीत असेल, लोकांमध्ये न्यायालयांबद्दल अविश्वास निर्माण होईल, असे काही करत असेल, तर संबंधितांविरोधात अवमानाचा खटला चालविण्याचा अधिकार न्यायालयांना नक्कीच आहे. पण हे तत्त्व सरसकटपणे सर्वच चर्चा, प्रतिक्रिया, भूमिका यांना लावता येणार नाही. न्यायदानाचे काम प्रभावीपणे करता यावे, यासाठी काही विशेषाधिकार न्यायालयांकडे नक्कीच आहेत. पण ते कधी आणि कसे वापरायचे याचे तारतम्य हे न्यायालयांनीच ठेवले पाहिजे. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा संकोच होईल आणि लोकांना न्यायालयांबद्दल, न्यायिक प्रक्रियेबद्दल आपले मतच मांडता येणार नाही, असे व्हायला नको. शेवटी न्यायालयेसुद्धा राज्यघटनेने निर्माण केलेल्या एका व्यवस्थेचाच भाग आहेत आणि त्याच राज्यघटनेने नागरिकांना काही मूलभूत अधिकार दिले आहेत.

# शिष्टमंडळांसमोरील आव्हान

**शिष्टमंडळांत आणखी कोण सदस्य असावेत, जम्मू-काश्मीरचे प्रतिनिधी किती असावेत, यांबाबतही वादविवाद होत आहेत. खरे तर प्रदीर्घ काळानंतर भारत अशा प्रकारची शिष्टमंडळे विविध देशांत पाठवीत आहे.**



पहलगाम दहशतवादी हल्ल्याचे कारस्थान घडवून आणणाऱ्यांना लक्ष्य करण्यासाठी राबविण्यात आलेली 'ऑपरेशन सिंदूर' ही मोहीम आणि त्यानंतर पाकिस्तानने केलेल्या हल्ल्यांना भारताने दिलेले प्रत्युत्तर यांबाबत जगभरात विविध देशांना माहिती देण्यासाठी सर्वपक्षीय शिष्टमंडळे पाठविण्याची संकल्पना स्वागतार्ह आहे. पक्षीय मतभेद विसरून जगासमोर देशाची ठाम भूमिका मांडण्यासाठीचे हे पाऊल उचलून मोदी सरकारने 'वयं पंचाधिकं शतम्' असल्याचे दाखवून दिले आहे. मात्र, या शिष्टमंडळांतील सदस्यांच्या निवडीवरून सुरू असलेले राजकारण 'वयं पंचाधिकं शतम्'मागील भावना दाखविणारे नाही. काँग्रेसचे खासदार शशी थरूर हे यांपैकी एका शिष्टमंडळाचे नेतृत्व करणार असून, त्यांची निवड ही या राजकारणाच्या मुळाशी आहे.

या शिष्टमंडळांत आपल्या पक्षाचे कोण असावेत, यासाठीची विचारणा सरकारकडून काँग्रेससह अन्य पक्षांना झाली. त्यानंतर काँग्रेसने चौघांची नावे दिली; परंतु त्यात थरूर यांचे नाव नव्हते. असे असताना शिष्टमंडळात थरूर कसे, असा प्रश्न काँग्रेसकडून विचारला जात आहे. संयुक्त राष्ट्रांतील कामाचा थेट अनुभव, आंतरराष्ट्रीय राजकारणाचे ज्ञान; तसेच राजनैतिक चौकटीतील मांडणी या निकषांवर थरूर यांचा शिष्टमंडळातील समावेश रास्त ठरतो; परंतु अंतर्गत राजकारणामुळे काँग्रेसने त्यांना डावलल्याचे दिसते. केरळमध्ये होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीचा संदर्भही याला आहे.

गेल्या काही महिन्यांपासून थरूर मोदी सरकारची भलामण करताना दिसत आहेत. पहलगाम हल्ल्यानंतर मोदी सरकारने घेतलेल्या सर्व निर्णयांचे त्यांनी स्वागत केले होते; तसेच ह्यऑपरेशन सिंदूरह्णनंतर त्यांनी आंतरराष्ट्रीय माध्यमांत भारताची बाजू भक्कमपणे मांडली होती. काँग्रेसने डावलण्यामागे ही कारणेही असू शकतात. थरूर यांची निवड करून सरकारने एक प्रकारे काँग्रेसवर कुरघोडी केली आहे. आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर भारताची बाजू मांडण्याचा विषय ओळखून काँग्रेसनेही थरूर यांना संधी दिली असती, तर अधिक चांगले झाले असते. या राजकारणामुळे सर्वपक्षीय शिष्टमंडळाची सुरुवात अडखळत झाली आहे. शिष्टमंडळांत आणखी कोण सदस्य असावेत, जम्मू-काश्मीरचे प्रतिनिधी किती असावेत, यांबाबतही वादविवाद होत आहेत. खरे तर प्रदीर्घ काळानंतर भारत अशा प्रकारची शिष्टमंडळे विविध देशांत पाठवीत आहे.

एकूण सात शिष्टमंडळे पाठविली जाणार असून, थरूर यांच्याखेरीज रविशंकर प्रसाद, बैजयंत पांडा (भाजप), संजयकुमार झा (संयुक्त जनता दल), कनिमोळी करुणानिधी (द्रमुक), सुप्रिया सुळे (राष्ट्रवादी काँग्रेस झ्र शरद पवार) आणि श्रीकांत शिंदे (शिवसेना - शिंदे) हे देखील शिष्टमंडळांचे नेतृत्व करणार आहेत. पहलगाम हल्ल्यांनंतर पाकिस्तान आणि पाकव्याप्त जम्मू-काश्मीरमधील दहशतवादी तळांवर हल्ले करून भारताने चोख प्रत्युत्तर दिले; त्यानंतर पाकिस्तानने शस्त्रसंधीसाठी पुढाकार घेतला. मात्र, त्यानंतरचा शस्त्रसंधी, आपण भूमिका बजावून अणुयुद्ध रोखल्याचा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा दावा आणि या युद्धात आपलाच विजय झाल्याची पाकिस्तानची दर्पोक्ती यांमुळे भारताचे यश झाकोळून गेले आहे. प्रचारयुद्धात पाकिस्तानने आघाडी घेतल्याचे चित्र आहे. अशा स्थितीत भारताची भूमिका आणि कामगिरी प्रभावीपणे जगासमोर मांडण्याचे आव्हान या नेत्यांसमोर असेल.

जम्मू-काश्मीरमध्ये कलम ३७० हटविल्यानंतरची परिस्थिती, तेथे वाढत गेलेले पर्यटन, रेल्वेसह होत असलेला पायाभूत विकास आणि दहशतवाद्यांकरवी पाकिस्तानने छेडलेले छुपे युद्ध यांबाबत जगाला तपशीलवार माहिती देण्याचे काम या शिष्टमंडळांना प्रभावीपणे करावे लागेल. 'ऑपरेशन सिंदूर'नंतर भारताने जी पावले उचलली, तशीच पावले पाकिस्तानही उचलत आला आहे.

भारताच्या मोहिमेची माहिती देण्यासाठी परराष्ट्र सचिवांसह सुरक्षा दलांच्या प्रतिनिधींची संयुक्त पत्रकार परिषद असो की पंतप्रधानांनी थेट हवाई तळावर जाऊन संबोधित करणे असो; पाकिस्तानने एक प्रकारे या सर्वांची भ्रष्ट नक्कल केली आहे. आता भारताने सर्वपक्षीय शिष्टमंडळ पाठविण्याचा निर्णय जाहीर केल्यानंतर पाकिस्तानही अशाच प्रकारची शिष्टमंडळे पाठविण्याचे ठरविले आहे.


## वसई-विरार शहर महानगरपालिका

प्रभाग समिती (ई) नालासोपारा (पश्चिम)

मुख्य कार्यालय विरार

दुरध्वनी क्र. १२२५० - २४०२१७९ / २४०२५६३

जावक क्र. -व.वि.श.म./क.वि./8/4/२५-२६
दिनांक - 21-5-25

### जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदभार्ने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | रिसीट नं. | ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरिददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | निळेमोरे-५ | NL२८/२६/१६ | ६८५३ | अख्तर हसनैन जैदी | किशन सिंह राजपुत |
| २ | निळेमोरे-५ | NL२८/१०६/२४ | ८७ | ए.के. मेहता | पुष्कर मनोहर जोशी व विभा पुष्कर जोशी |
| ३ | निळेमोरे-५ | NL२८/१०९/२१ | ११६ | राजेन्द्र आर वर्मा | दिलीप कुमार गौड व आरती दिलीप गौड |
| ४ | निळेमोरे-५ | NL२८/१५१/६ | ६२ | एल एम काझी एम एस | विनोद सुर्यकांत जाधव |
| ५ | निळेमोरे-५ | NL२८/१५/१९ | १८१ | साबीया साजीद गांजीवाला | विनायक बसप्पा नंदगावे |
| ६ | निळेमोरे-५ | NL२८/२१/३४ | २१५ | अशोककुमार पांण्डे | मैमुना कलदर शेख/आदम कलंदर शेख |
| ७ | निळेमोरे-५ | NL२८/१००/१६ | १८९ | अशरफ इबाहिम अग्लेदिया | कुलसुम मोहम्मद अहमद उमतीया |
| ८ | निळेमोरे-५ | NL२८/७६/१ | १८३ | प्रकाश शिवराम नार्वेकर | पुरुषोत्तम गमा मकवाना / चंपा मकवाना |
| ९ | निळेमोरे-७ | NL३०/२५३/१८ | १७७ | नलीनाझी दयानंद पुजारी | सुमीत सखाराम शिंदे |
| १० | निळेमोरे-७ | NL३०/३१७/३१ | २१३ | ओम साई डेव्ह. | सुनील कुमार लालजी यादव/अजय कुमार लालजी यादव |
| ११ | निळेमोरे-७ | NL३०/४०७/६२ | १३८ | घाराराम राणा | उषादेवी सुरज शुक्ला |
| १२ | निळेमोरे-७ | NL३०/२८५/१९ | १३२ | विजयकुमार बी गुप्ता | बिजेंन्द्र कुमार मेवालाल मिना |
| १३ | निळेमोरे-७ | NL३०/३५६/५१ | १४३ | एकलव्य कंन्स्ट्र. | मेघण गोपाल कर्वे/सिध्दांत जयवंत ठाकूर |
| १४ | निळेमोरे-७ | NL३०/३२०/२ | ९७ | एम के. डेव्ह. | काशीनाथ शनिवार पाटील |
| १५ | निळेमोरे-७ | NL३०/३६९/५५ | ८९ | उषा विनोद पाठक | भुवाल रामआसरे सिंह |
| १६ | निळेमोरे-७ | NL३०/४००/३ | ९१ | विनायक चंद्रकांत भुर्की | प्रमोद आर गायकवाड/प्रज्ञा प्रमोद गायकवाड |
| १७ | निळेमोरे-७ | NL३०/३२०/४ | ९५ | एस के. डेव्हलपर्स | काशीनाथ शनिवार पाटील |
| १८ | निळेमोरे-७ | NL३०/३२०/१ | ९८ | एस के. डेव्हलपर्स | काशीनाथ शनिवार पाटील |
| १९ | निळेमोरे-७ | NL३०/३२०/३ | ९६ | एस के. डेव्हलपर्स | काशीनाथ शनिवार पाटील |
| २० | निळेमोरे-७ | NL३०/३४२/२९ | १०० | विनोद कुमार | अंजु |

सही /-
(अश्विनी मोरे)
सहायक आयुक्त
प्रभाग समिती (ई) नालासोपारा
वसई विरार शहर महानगरपालिका

## भाईंदरच्या इंद्रलोकमध्ये रस्ता खचून मोठी दुर्घटना



■**भाईंदर :** भाईंदर पूर्वेच्या इंद्रलोक परिसरात एका आर. एन.ए. बिल्डरच्या बांधकामाच्या ठिकाणी पाय लिंग खोदून बेसमेंट बनविण्याचे काम करत असताना त्याठिकाणी मोठी दुर्घटना घडून पालिकेचे गटार, पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन तुटली व उच्च दाबाच्या अंतर्गत विद्युत वाहिन्यांचे नुकसान झाले आहे. तसेच नवीन बनविलेला सिमेंट रस्ता पूर्णपणे आतून ढासळला आहे. सदरील ठिकाणी सुदैवाने कुठलीही जीवित हानी झाली नसली तरीही या ठिकाणी मोठे नुकसान झाले आहे.भाईंदर पूर्वीच्या इंद्रलोक परिसरात महापालिकेच्या आरक्षण क्रं. २२६ मध्ये समावेशक आरक्षणाच्या जागेत आर.एन.ए. बिल्डर यांचे मौजे नवघर येथील सर्व्हे क्रं. नवीन २८ (जुना २२७) हिस्सा क्रं. ३, २७ (२२८) हिस्सा क्रं. १२, ३० (२३६) हिस्सा क्रं. ३ बांधकाम सुरू होते. त्यात बेसमेंट १ अधिक बेसमेंट २ अधिक पार्ट तळ अधिक १ ते ४३ मजले अधिक ४४ वा मजला खेळ आणि मनोरंजनासाठी बांधकाम परवानगी दिली आहे.

त्याच जागेवर तीस फूट खोल बेसमेंट होत असताना बाजूलाच पालिकेचा १५ मीटर डीपी रस्ता असून त्या ठिकाणी आत्ताच काही दिवसापूर्वी एमएमआरडीएच्या माध्यमातून नवीन सिमेंट रस्ता बांधला आहे. त्या रस्ता आणि गटार बांधले आहे, त्याला चिटकूनच बिल्डरांनी त्याठिकाणी ३० फुटांहून अधिक खोल जमीन खोदली आहे. त्याठिकाणी त्या गटार व सिमेंट रस्त्याला कुठलाच आधार नसताना त्याठिकाणी खोली खोदली. यामुळे त्याठिकाणी बिल्डरांची पायलिंग रस्ता पडून रस्ता व गटार आणि पिण्याच्या पाण्याच्या पाईपलाईन तुटून रस्ता खचला आहे.

याप्रकरणी पालिका अधिकार्यांनी घटनास्थळी धाव घेत त्या ठिकाणची पाहणी केली व तातडीने त्या ठिकाणचा रस्ता वाहतुकीसाठी बंद केला आहे. तसेच तातडीने रस्ताचे काम व पाईपलाईन जोडणी करण्याचे आदेश संबंधित विकासकाला देण्यात आले आहेत, तसेच तातडीने सदरील कामाची पाहणी करून सदरील इमारतीचे बांधकाम थांबवावे असे आदेश पारित केले आहेत. तसेच त्यावर पालिका दंडात्मक कारवाई प्रस्तावित करणार आहोत असे नगररचना विभागाचे सहायक संचालक पुरुषोत्तम शिंदे यांनी सांगितले आहे. त्याठिकाणी शासकीय मालमत्तेचे नुकसान होऊन मोठी दुर्घटना किंवा जीवितहानी टळली आहे. मात्र सदरील ठिकाणी अपघात घडला असता तर परिस्थिती वेगळी असती असे चित्र आहे.

## अखेर काशीगाव मेट्रोस्थानकाच्या जिन्याचे काम सुरू

■**भाईंदर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी ट्रायल चाचणी केलेल्या मेट्रो मार्गिका ९ मधील काशिगाव मेट्रो स्टेशनच्या जिन्याचे काम मागच्या दोन वर्षांपासून मिरा-भाईंदरचे भाजप आमदार नरेंद्र भेटता यांनी बंद पाडले होते. परंतु,मुख्यमंत्र्यांच्या सुचनेनंतर लगेच त्या ठिकाणी पायलिंग खोदण्याचे काम सुरू आहे.

मिरा -भाईंदर शहराच्या मुख्य सार्वजनिक रस्त्यावर काशिगाव मेट्रो स्थानकाच्या जिन्याचे काम सुमारे २ वर्षांपासून मेहतांच्या कंपनीने जागेच्या मोबदल्यावरून बंद पाडले होते. मेट्रोच्या तांत्रिक चाचणीसाठी आलेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडे सदर बाब एमएमआरडीए अधिकार्यांसह काहींनी निदर्शनास आणून दिल्या. त्यानंतर फडणवीस यांनी मेहतांची कानउघडणी करत नाराजी व्यक्त केली. मुख्यमंत्रीच बोलल्यानंतर गेले दोन वर्ष बंद पाडलेले मेट्रो जिन्याचे काम तात्काळ सुरु झाले आहे


मेट्रो स्थानकाचा जिना जिकडे बांधायचा आहे तो मुळात पालिकेने ४५ मीटर विकास आराखड्यातील विकसित केलेला सार्वजनिक वापरातील रस्ता आहे. त्या लगत पालिकेचा नाला आहे. मात्र काही वर्षा पूर्वी जागा विकत घेऊन मेहतांनी वापरातील जुना रस्ता आणि नाल्यावर मेट्रोचे काम रोखून धरणे निंदनीय आहे,असे आरोप सातत्याने मेहतांवर केले गेले. तर याबाबत तत्कालीन पालिका आयुक्त संजय काटकर यांनी ठराव करून सदरील जागेचे भूसंपादन करण्यासाठी ठाणे जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रस्ताव पाठवून दिला आहे. भाईंदर पश्चिम, मॅक्सस पुढील तोदिवाडी येथे २०२० साली देखील डीपी रोड आणि मेट्रोचे काम मेहतांच्या कंपनीने बंद पाडल्याचे तोंडी आणि लेखी आरोप झाले होते. त्यावेळी जमीन धारक श्यामसुंदर अग्रवाल यांनी पालिकेस पत्र देऊन, सदर जागेचा मेहतांच्या कंपनीशी संबंध नसून मेट्रो आणि रस्त्याचे काम करावे म्हणून लेखी परवानगी पालिकेला दिली होती. त्या नंतर पालिकेने मेट्रोचे काम केले. तेव्हा सुद्धा प्रताप सरनाईक यांनी पालिकेस पत्र देऊन मेट्रोचे काम बंद पाडणार्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली होती.



## एमयूटीपी प्रकल्पांसाठी १७७७ कोटींचा निधी
## उपनगरिय रेल्वेला मिळणार चालना

■**मुंबई :** मुंबईतील सर्वात जास्त भार लोकल सेवेवर आहे. या लोकल सेवेतून रोज ८० लाख प्रवासी प्रवास करतात. मुंबईकरांची गरज लक्षात घेऊन रेल्वे मंत्रालयाने २०२५-२६ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात मुंबई शहरी परिवहन प्रकल्पांसाठी (एमयूटीपी) १,७७७कोटींचा निधी मंजूर केला आहे. हा निधी गेल्या वर्षीच्या ७८९ कोटींच्या तुलनेत १२५ टक्क्याने वाढलेला आहे. यामुळे मुंबई महानगर क्षेत्रातील विविध उपनगरीय रेल्वे प्रकल्पांना चालना मिळणार आहे.

मुंबई महानगरातील प्रवाशांचा प्रवास सुखद व वेगवान करण्यासाठी मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशनमार्फत मुंबई शहरी परिवहन प्रकल्पामार्फत विविध रेल्वे प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. या प्रकल्पांना गती देण्यासाठी केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये निधीची तरतूद करण्यात येते. त्यानुसार या प्रकल्पांना गती मिळते. चालू आर्थिक वर्षासाठी केंद्रीय अर्थसंकल्पात एमयूटीपी प्रकल्पांसाठी १,७७७ कोटींचा निधी उपनगरीय प्रकल्प मार्गी लावण्यासाठी देण्यात आला आहे. मुंबई शहरी वाहतूक प्रकल्प (टप्पा-२) १०० कोटी, मुंबई शहरी वाहतूक प्रकल्प (टप्पा-३) ८०० कोटी आणि मुंबई शहरी वाहतूक प्रकल्प (टप्पा-३/अ) ८७७ कोटी अशी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये राज्य सरकार तितकीच रक्कम प्रदान करणार आहे. यामुळे एकूण निधीचा पुरवठा दुप्पट होणार आहे.



या निधीच्या माध्यमातून महत्त्वपूर्ण एमयूटीपी प्रकल्पांना गती मिळणार असून यामुळे महानगरातील कनेक्टिव्हिटी सुधारून प्रवाशांना अधिक सुविधा मिळणार आहेत. भक्कम आर्थिक पाठबळामुळे नवीन कॉरिडॉर, स्टेशन उन्नतीकरण आणि सुधारित रेल्वे पायाभूत सुविधा यांसह महत्त्वपूर्ण एमयुटीपी प्रकल्प वेगात प्रगती करत आहेत. यामुळे मुंबईतील प्रवाशांना अधिक जलद, सुरक्षित व कार्यक्षम उपनगरीय रेल्वे नेटवर्क मिळण्याकडे मोठे पाऊल उचलले गेले आहे, असे एमआरव्हीसीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विलास वाडेकर यांनी सांगितले.

## खासदार नरेश म्हस्के यांच्याकडून विकासकामांचा आढावा

■**भाईंदर :** भाईंदर रेल्वे स्थानक येथे ठाणे लोकसभेचे खासदार नरेश म्हस्के यांनी सोमवारी सकाळी ११ च्या सुमारास रेल्वे स्टेशनवरील विकासकामांचा आढावा घेतला.यावेळी बोलताना नवीन कामे लवकरच मंजूर होतील, तेव्हा भाईंदर रेल्वे स्थानकाचा अजून विकास होणार आहे. तसेच गुजरात, राजस्थान व उत्तर प्रदेशात जाणाऱ्या लांब पल्ल्याच्या मेल गाड्यांना लवकरच मिरा- भाईंदरमध्ये थांबा मिळणार आहे. यासाठी शासन दरबारी प्रयत्न सुरू असल्याचे म्हस्के यांनी सांगितले आहे. यावेळी प्रसारमाध्यमांशी बोलताना म्हस्के म्हणाले की, भाईंदर रेल्वे स्टेशनवरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना अधिकाधिक सुविधा मिळाव्यात यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत. भाईंदर व मिरारोड या दोन्ही ठिकाणी संबंधित अधिकारी, अभियंते, स्टेशन मास्टर यांच्यासोबत एक बैठक घेतली.



प्रवाशांना दर्जेदार सेवा देण्याच्या उद्देशाने, लांब पल्ल्याच्या गाड्यांना या स्थानकांवर थांबा मिळावा यासाठीही वरिष्ठ अधिकाऱ्यांना प्रस्ताव पाठवण्यास सांगितले. रेल्वे ही नागरिकांच्या सेवेकरता आहे, हजारो नागरिक लोक दिवसाला रेल्वेने प्रवास करतात.भाईंदर स्टेशनवर सध्या काम सुरु आहे. ८ एक्सीलेटर, ४ लिफ्ट आहेत व आणखी चार एक्सीलेटर लावण्यात येत आहेत. लिफ्ट व पार्किंगच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येत आहेत. नागरिकांना प्लॅटफॉर्मवर जास्तीत जास्त जागा कशी मिळेल या करता प्रयत्न करण्यात येत असून प्लॅटफॉर्मवरील सर्व ऑफिसेस एका इमारतीत एकाच जागी करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. काम सुरु असून दिवसा काम करता येत नाही. त्यामुळे रात्रीची कामे केली जाते आहेत. मात्र कश्या प्रकारे कामे लवकरात लवकर पूर्ण केली जातील याकडे लक्ष दिले जात आहे, अशी माहिती त्यांनी दिली. यावेळी रेल्वे एजीएम अनिल करवंदे, डीईई एमआरव्हीसी विनेशकुमार शर्मा, भाईंदर रेल्वे स्टेशनचे स्टेशन मास्टर भारती राजविर, उप अभियंता राजकुमार शर्मा, आरपीएफ पीआय परीमल वानखेडे, मिरारोड स्टेशन मास्टर नरेश प्रसाद, शिवसेना जिल्हाप्रमुख राजू भोईर, भाईंदर विधानसभा शहरप्रमुख विक्रम प्रताप सिंग, उपजिल्हाप्रमुख जयराम मेसे, उत्तर भारतीय जिल्हाप्रमुख विद्याशंकर चतुर्वेदी, राजस्थान सेल जिल्हाप्रमुख कपिल परमार, उपजिल्हाप्रमुख रामभुवन शर्मा, उपशहरप्रमुख जावेद शेख, शाखाप्रमुख महेश शिंदे व अंकित शहा, उपशहरप्रमुख उबेद शेख व सतिश सिंग, जिल्हा सचिव सुभाष यादव, विभागप्रमुख इम्रान खलिफा, माजी नगरसेविका शर्मिला बगाजी, उपशहरप्रमुख संकेत पाटील, शाखाप्रमुख समीर खान आणि शॉन इतर उपस्थित होते.

## मच्छीमारांचे अवकाळी पावसामुळे मोठे नुकसान

■**भाईंदर :** महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून अवकाळी पाऊस पडत आहे. या पावसामुळे शेतकर्यांचे मोठे नुकसान होत आहे. भाईंदर पश्चिमेच्या उत्तम परिसरात अवकाळी पावसामुळे मच्छीमारांचे मोठे नुकसान झाले आहे. भाईंदर पश्चिमेच्या उत्तन परिसरात कोळी समाजाचे लोक मोठ्या प्रमाणात राहतात. त्यांचा मूळ व्यवसाय मासेमारी आहे. उत्तन परिसरात ८०० बोटी आहेत. मासेमारी हंगाम सुरू झाल्यानंतर सुरूवातीचे काही महिने मासे कमी प्रमाणात मिळत होते. मासेमारीसाठी समुद्रात बोट गेल्यानंतर परत येईपर्यंत मोठ्या प्रमाणात खर्च येतो. मासे कमी मिळाल्याने झालेला खर्च देखील मिळत नाही. त्यामुळे मच्छिमारांचे नुकसान होत होते. त्यामुळे कर्ज काढून अनेक मच्छिमार मासेमारीसाठी जात आहेत. केलेला खर्च देखील निघत नसल्याने मच्छीमार हवालदिल झाले आहेत.



मच्छीमारांचा शेवटचा हंगाम सुरू झाला आहे. या शेवटच्या हंगामात मिळालेले मासे सुकवून ते पावसाळ्यात विक्री केले जातात. पावसाळ्यात मासेमारी बंद असल्याने सुकवलेले मासे विकून त्यावर आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह केला जातो. आता शेवटच्या हंगामात मासे मिळण्यास सुरुवात झाली, तर अवकाळी पाऊस सुरू झाला आहे. अनेक मच्छीमारांनी मासे सुकविण्यासाठी बाहेर टाकले होते. मे महिन्यात अवकाळी पावसामुळे मच्छीमारांना समुद्रात मासे मिळाले नाहीत. आता शेवटच्या हंगामात मासे मिळत आहेत. परंतु २२ मे ते ३० मे दरम्यान वादळी वाऱ्यांचा इशारा असल्यामुळे मासेमारीसाठी गेलेल्या बोटी पुन्हा बाहेर येण्यासाठी निघाल्या आहेत. परत आलेल्या बोटी मासेमारीसाठी पुन्हा समुद्रात जातील की नाही याची शाश्वती नाही. शेवटच्या दिवसात वादळी वारे येणार असल्यामुळे मासेमारी बंद करावी लागणार असल्याने मच्छीमारांवर मोठे संकट आले आहे. शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिली जाते, त्याचप्रकारे मच्छीमारांना देखील शासनाने नुकसान भरपाई देण्याची मागणी उत्तन येथील मच्छीमारांनी केली आहे. पावसामुळे उत्तन समुद्र किनारी मासळी सुकवलेली असताना संपूर्ण मासळी खराब झाली आहे. त्यामुळे कोळी स्त्रिया रडू लागल्या आहेत. गेले चार महिने मासळीचा दुष्काळ होता. आता शेवटच्या हंगामात हाती आलेली मासळी वाया गेली आहे. त्यामुळे मच्छीमारांचे भरपूर नुकसान झाले आहे. शासनाने आता तरी शेतीला आर्थिक नुकसान भरपाई दिली जाते , त्याप्रमाणे मच्छिमार कोळी समाजाला मदत करावी अशी मागणी माजी

## वसई शहरात १ कोटी ६० लाखांचा मॅफेड्रोन जप्त



■**वसई :** वसई-विरार शहरातील विविध ठिकाणच्या भागात छुप्या मार्गाने अंमलीपदार्थांची तस्करी होत असल्याच्या घटना समोर येऊ लागल्या आहेत. तसेच नालासोपार्यात एकापाठोपाठ एक अमली पदार्थांच्या तस्करी होण्याच्या घटना समोर येऊ लागल्या आहेत. रविवारी सायंकाळी सातच्या सुमारास नालासोपारा पूर्वेच्या यशवंत हाइट्स जवळील मुख्य रस्त्यावर अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या नायजेरियन महिलेला अटक करण्यात आली आहे. व्हिक्ट्री अबेके (२३) असे महिलेचे नाव असून तिच्याकडून १ कोटी ६० लाखांचा मॅफेड्रोन नावाचा अमली पदार्थ जप्त केला आहे. रविवारी नालासोपारा पूर्वेच्या यशवंत हाईट्स जवळील परिसरात एक महिला अमली पदार्थ तस्करी करण्यासाठी येणार असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार तुळींज पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण पथक व एटीसी पथकाने सापळा रचून संशयित नायजेरियन महिलेला ताब्यात घेतले तिची झडती घेतली असता तिच्या बॅगेत मॅफेड्रोन नावाचा अमली पदार्थ आढळून आला आहे. ८०० ग्रॅम वजन असलेला १ कोटी ६० लाख रुपये किंमतीचा अमली पदार्थ जप्त केला आहे.याप्रकरणी व्हिक्ट्री अबेके या महिलेला अटक करून तिच्या विरुद्ध तुळींज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असल्याची माहिती पोलीस उपनिरीक्षक राहुल फड यांनी दिली आहे.

## कामगारांना वायुबाधा प्रकरण
## कारखाना व्यवस्थापनाविरोधात गुन्हा नोंद

■**बोईसर :** बोईसरमध्ये रासायनिक कारखान्यात उत्पादन प्रक्रिया सुरू असताना रसायन बाहेर फेकल्याने कामगारांना वायुबाधा झाली होती. त्यामुळे जीवितास धोका निर्माण केल्या प्रकरणी तारापूर औद्योगिक क्षेत्रातील कारखाना व्यवस्थापनाविरोधात बोईसर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तारापूर औद्योगिक क्षेत्रातील प्लॉट क्रमांक डी - २/३ वरील कॅम्लीन फाईन सायन्स लिमिटेड या रासायनिक कारखान्यात रविवारी पहाटे तीन वाजेच्या सुमारास डाय मिथाईल सल्फेट नावाचे रसायन चौथ्या क्रमांकाच्या प्लांट मधून १० व्या क्रमांकाच्या प्लांटमध्ये हस्तांतर करण्याची प्रक्रिया सुरू होती. या प्रक्रियेदरम्यान प्लांटचे झाकण बंद करण्यास उशीर झाल्याने डाय मिथाईल सल्फेट हे रसायन बाहेर येऊन जमिनीवर पडून त्याचा हवेशी संपर्क झाला. यामुळे त्या ठिकाणी उपस्थित दहा कामगारांना बाधा होऊन डोळ्यांना त्रास होऊ लागल्याने बाधित सर्व कामगारांना उपचारासाठी बोईसर येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. रुग्णालयात दाखल सर्व कामगारांची प्रकृती धोक्याबाहेर असल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितले. कॅमलिन फाईन सायन्स कारखान्यातील रसायन बाधा प्रकरणी बोईसर पोलीस आणि औद्योगिक व आरोग्य संचालनालयाचे अधिकारी यांनी भेट देऊन पाहणी करून घटना नेमकी कशी घडली याची माहिती घेतली. तसेच बाधित कामगार यांची विचारपूस करून त्यांचे जबाब नोंदविण्यात आले आहेत. कामगारांच्या जीवितास धोका निर्माण केल्याप्रकरणी कॅमलीन फाईन सायन्स कारखान्याच्या व्यवस्थापना विरोधात बोईसर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. यापकरणी औद्योगिक आणि आरोग्य संचालनालय देखील आपला अहवाल सादर करणार आहे.



## वडिलांच्या अंत्यविधीसाठी निघालेल्या लेकीवर काळाचा घाला
## जगबुडी नदीत कार कोसळली, ५ जणांचा जागीच मृत्यू

■**रत्नागिरी :** मुंबई-गोवा महामार्गावर आज सकाळी हृदयद्रावक घटना घडली. भरधाव वेगात असलेली एक कार खेड तालुक्यातील जगबुडी नदीच्या कोरड्या नदीपात्रात कोसळल्याने पाच जणांचा जागीच मृत्यू झाला, तर दोघे जखमी झाले आहेत. मृतांमध्ये नालासोपारा आणि मीरा-भाईंदर परिसरातील नागरिकांचा समावेश आहे.

मीरा भाईंदर येथील रहिवासी विवेक मोरे, त्यांच्या पत्नी मिताली मोरे (४५ वर्ष) आणि त्यांचा मुलगा निहार मोरे (१९ वर्ष), तसेच नालासोपारा येथील सौरभ परमेश पराडकर (२२ वर्षे), मेधा परमेश पराडकर आणि मोरे यांचा भाचा श्रेयस राजेंद्र सावंत (२३ वर्षे) हे किया कार (एमएच ०२ ३२६५) मधून प्रवास करत होते. हे सर्वजण मिताली मोरे यांच्या माहेरी देवरुख येथे त्यांच्या वडिलांच्या अंत्यविधीसाठी निघाले होते.



घटनेची माहिती मिळताच खेड पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि आपत्कालीन बचाव पथक तातडीने घटनास्थळी पोहोचले. क्रेनच्या मदतीने कार नदीपात्रातून बाहेर काढण्यात आली असून अपघाताबाबत पुढील तपास सुरू आहे.

पहाटे ५.४५ च्या सुमारास जगबुडी नदीच्या पुलावर चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटले आणि कार दुभाजकाच्या मधून थेट सुमारे १०० ते १५० फूट खोल कोरड्या नदीपात्रात कोसळली. नदीपात्र कोरडे असल्याने कार थेट दगडांवर आदळली आणि अक्षरशः चेंदामेंदा झाली. अपघात इतका भीषण होता की पाच प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला.

यामध्ये वडिलांच्या अंत्यसंस्कारासाठी निघालेल्या मिताली मोरे यांच्यासह त्यांचा मुलगा निहार, तसेच सौरभ पराडकर, मेधा पराडकर आणि श्रेयस सावंत यांचा जागीच मृत्यू झाला. तर विवेक मोरे आणि चालक गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर रत्नागिरी जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

अंत्यसंस्कारासाठी गेलेल्या या प्रवाशांवरच अंत्यसंस्काराची वेळ येईल याची कोणी कल्पनाही केली नव्हती. या दुर्घटनेमुळे नालासोपारा आणि मीरा-भाईंदर परिसरात शोककळा पसरली असून हळहळ व्यक्त केली जात आहे.

## ब्रेक निकामी झाल्याने डंपर चढला डिव्हायडरवर

■**कल्याण :** कल्याण पूर्वेकडील पुणे लिंक रोड येथील विजयनगर येथे एक रेतीने भरलेला डंपर ब्रेक निकामी झाल्याने डिव्हायडरवर चढून त्याचा अपघात झाला. या अपघातात सुदैवाने कोणतीही जिवीतहानी झालेली नाही. मात्र, ही दोन महिन्यातली तिसरी घटना आहे. येथील काटे मानवली नाका ते पुणे लिंक रोड, विजयनगर, तिसगाव नाका, चक्की नाका येथे मोठा उतार असल्याने अवजड वाहनांचे असे अपघात होत आहेत. विजयनगर भागात अगदी काही दिवसांपूर्वी अशाच एका ब्रेक निकामी झालेल्या मोठ्या ट्रकने सात आठ वाहनांना धडक दिली होती. यात तीन जण गंभीर जखमी झाले होते. अशा घटना यापूर्वीही इथे घडल्या आहेत. त्यानंतर आता पुन्हा एकदा डंपरचे ब्रेक निकामी होऊन अपघात झाल्याचा प्रकार घडला. याचे कारण, या रस्त्यावर मोठा उतार असून मोठ्या अवजड वाहनांचे या रस्त्यावर ब्रेक दाबला तरी वाहन पुढे जात राहते. अशावेळी अनेकदा ब्रेक निकामी होण्याचा प्रकार होतो. त्यामुळे काटेमानिवली टेकडीचा हा चढ कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कापून समतल करावा. जेणेकरून अवजड वाहनांचे अपघात होणार नाहीत. तसेच, या भागात वाहतूक पोलीस, वाहतूक नियंत्रणासाठी सिग्नल बसवले जावेत अशी मागणी माजी नगरसेवक महेश गायकवाड यांनी केली आहे.

इथले स्थानिक नागरिक अविनाश ओंबासे यांनी दिलेल्या माहितीनुसार या रस्त्यावर एक दिवसाआड अशा अपघाताच्या छोट्या- मोठ्या घटना घडत आहेत. तसेच, या भागात शाळा आहेत. जर शाळा सुटल्यावर विद्यार्थी बाहेर पडताना असे अपघात झाल्यास मोठी दुर्घटना होऊ शकते असे भीती ओंबासे यांनी व्यक्त केली आहे.दरम्यान, वाहतूक पोलीस आणि कल्याण झ डोंबिवली महानगरपालिकेकडे इथे ट्राफिक वॉर्डन नेमण्याची मागणी अनेक दिवसांपासून केली जात आहे. मात्र, त्यांनी आजतागायत इथे ट्राफिक वॉर्डन नेमला नसल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com